# कामखेडा गटात भाजपाला बहुमताने विजयी करा; जिल्ह्याचे मुख्यमंत्रीपद मिळू शकते - आ. कराड

## भाजपाच्या कामखेडा, तत्तापूर, गरसुळी येथील प्रचार बैठकीला मतदारांचा मोठा प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधीः** महाराष्ट्राच्या विकासाची अंमलबजावणी मंत्रालयातून मुख्यमंत्री करतात, त्याच पद्धतीने ग्रामीण भागाच्या विकासाचे जिल्हा परिषद मंत्रालय असून जिपचा अध्यक्ष जिल्ह्याचा मुख्यमंत्री असतो लातूरचा अध्यक्ष भाजपचाच होणार यात कसलीच शंका नाही, आणि तो मान कामखेडा गटाला मिळू शकतो तेंव्हा कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघातून भाजपाच्या सौ. सरितातार्ई भिसे यांच्यासह दोन्ही पंचायत समिती उमेदवारांना बहुमताने विजयी करावे असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.



भारतीय जनता पार्टीच्या कामखेडा जिल्हा परिषद गटातील उमेदवार सौ. सरितातार्ई शंकरराव भिसे कामखेडा पंस गणातील उमेदवार शरद दरेकर आणि मोटेगाव पंस गणातील उमेदवार संतोष चव्हाण यांच्या प्रचारानिमित्ताने लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी शनिवारी सकाळी कामखेडा, तत्तापूर आणि गरसुळी येथे मतदारांच्या प्रचार बैठका घेतल्या. तिन्ही ठिकाणी मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावेळी तिन्ही उमेदवारसह माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, माजी सनदी अधिकारी शंकरराव भिसे, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, ओबीसी मोर्चाचे डॉ. बाबासाहेब घुले, माजी सभापती अनिल भिसे, डॉ. गोपाळ पाटील, अशोक राठोड, अजय गुडे, ज्ञानोबा औसेकर, अजय राठोड, आनंत पाटील, आप्पासाहेब पाटील, श्रीनिवास चव्हाण, बालाजी राठोड, अजित पाटील, राज जाधव, श्रीमंत नागरगोजे, नानासाहेब कसपटे, दीपक पवार, राजू हाके, निवृत्ती गुंडरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यावर प्रेम करणारा हा परिसर असून या भागाचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली हे माझे भाग्य समजतो असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पंधरा वर्ष काँग्रेस आमदारांनी या भागात कसलेही विकासाचे काम केले नाही. विकास खुंटला असे म्हणणाऱ्या माजी आमदार आणि गेल्या पाच वर्षात कोणती कामे केली काय दिवे लावले असा प्रश्न उपस्थित करून गेल्या चार-पाच वर्षात लाखो नव्हे तर कोट्यावधीचा निधी आणून गावागावात वाडी वस्तीत विकासाच्या योजना काय असतात याची जाणीव करून देण्याचे काम केले आहे. मी जे बोलतो ते करून दाखवतो.

शेतकऱ्यांची आडवा आणि जिरवा काँग्रेसचे धोरण असून ऊसाच्या प्रत्येक गाडीमागे तीन टन उसाचा काटा मारण्याचे पाप होत आहे. साखर कारखाने शेतकऱ्यांच्या मालकीचे असतानाही नौकरासारखी वागणूक दिली जाते ही परिस्थिती बदलावी लागेल असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी देशात आणि राज्यात विकासाचा डोंगर उभा केला. जात, धर्म न पाहता जो गरजू आहे पात्र आहे अशा सर्व लाभार्थ्यांना घरकुला सह विविध योजना देण्याचे काम केले जात आहे. मात्र काँग्रेसच्या काळात पुढाऱ्यांच्या मागे पुढे फिरणाऱ्यालाच घरकुले मिळत होती. विकास कामांना आडवे येणाऱ्या काँग्रेसवाल्यांना आडवे करण्याची ही वेळ आली असून आपल्या गावाचा परिसराचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी भाजपाच्या चारित्र्यसंपन्न आणि उच्चशिक्षित उमेदवारांना आशीर्वाद देऊन बहुमताने विजयी करावे असेही आवाहन केले.

यावेळी बोलताना माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे म्हणाले की, काँग्रेसमध्ये आज विलासरावांसारखी विकासाची दृष्टी असलेले नेते नाहीत. काँग्रेसचे प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम करीत होतो पक्षाने मला उमेदवारी दिली जनतेने आशीर्वाद देऊन आमदार केले मात्र काँग्रेसच्या नेते मंडळींनी कधीही मला आमदारकीचे सुख मिळू दिले नाही. हवे तसे काम करू दिले नाही. पदोपदी अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न झाला अत्यंत खालच्या स्तरावर राजकारण केले हे सर्व सहन होत नसल्याने विकासाची दृष्टी असलेल्या भाजपात प्रवेश केला. नरेंद्रजी मोदी आणि देवेंद्रजी फडणवीस यांनी देशात आणि राज्यात विकासाची उंची गाठली आहे. आ. रमेशआप्पा कराड यांनी गावो गावी विकास निधी आणून ग्रामीण भागाच्या विकासाला गती दिली असून आप्पांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. तेंव्हा विकासाची दृष्टी असलेल्या भाजपाला साथ देऊन आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या तिन्ही उमेदवारांना बहुमताने विजयी करा असे बोलून दाखवले.

या प्रचार बैठकीस त्या त्या गावातील सुभाष पवार, संदिपान मेकले, अमोल वाघमारे, विलास सूर्यवंशी, शिवराज चिल्लरगे, सिद्धाराम बिडवे, सोमनाथ चिल्लरगे, संजय भिसे, संगमेश्वर चिल्लरगे, परमेश्वर बिडवे, नेताजी सूर्यवंशी, सूर्यकांत सूर्यवंशी, उद्धव धावणे, संतोष तंगळे, गोविंद साखरे, ऋषिकेश पाटील, सुशील चव्हाण, सुरेश चव्हाण, निवृत्ती गुंडरे, बालाजी रूपनावर, बाबासाहेब घोडके, शाम पालकर, ओमप्रकाश कातळे, अरुण कातळे, रावसाहेब पवार, संतोष कातळे, अभिमान पांचाळ, गणपत मोरे, सचिन चिल्लरगे, शिवशंकर बिडवे, भागवत चिल्लरगे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी त्यांच्या गावातील महिला पुरुष मतदारांनी मोठा प्रतिसाद दिला.

# काँग्रेसचे विकासात्मक धोरण मतदार जाणतात; भाजपच्या खोट्या प्रचाराला ते बळी पडणार नाहीत

### माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधीः** लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लातूर ग्रामीण मतदारसंघातील औसा तालुक्यातील भादा येथे काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी संबोधित केले.

यावेळी भादा जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सौ. पुजा आण्णासाहेब होदाडे, भादा पंचायत समिती गणाचे उमेदवार श्री. किशोर देविदास जवंजाळे तसेच बोरफळ पंचायत समिती गणाच्या उमेदवार सौ. भैरवी ज्ञानेश्वर कदम यांच्या प्रचारासाठी ही सभा घेण्यात आली.

सभेत बोलताना माजी आमदार धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, काँग्रेस पक्षाच्या विचारधारेतून आणि सातत्यपूर्ण कार्यातून लातूर जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळाली आहे. एका बाजूला काँग्रेसने केलेला प्रत्यक्ष विकास असून दुसऱ्या बाजूला भाजपसारखा पक्ष केवळ जनतेची दिशाभूल करून आपली राजकीय पोळी भाजण्याचे काम करत आहे. मात्र आता मतदार खूप जागरूक झाला असून खरे आणि खोटे यातला फरक ओळखू लागला आहे.



लातूर महानगरपालिका निवडणुकीचा निकाल काँग्रेस पक्षाच्या बाजूने लागल्याने भाजपच्या खोट्या प्रचाराला आता मतदार बळी पडणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. येत्या ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या मतदानात जिल्हा परिषद व पंचायत समितीतील काँग्रेसचे सर्व उमेदवार निवडून येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या प्रचार सभेला खासदार डॉ. शिवाजी काळगे, प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते हणमंत पवार यांच्यासह काँग्रेस पक्षाचे उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने मतदार उपस्थित होते.

# एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशासाठी १ मार्च २०२६ रोजी प्रवेश परीक्षा

### १८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधीः** अनुसूचित व आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूल शाळांमध्ये प्रवेशासाठी १ मार्च २०२६ रोजी प्रवेश परीक्षा होणार आहे. पात्र विद्यार्थ्यांकडून या परीक्षेचे अर्ज भरून मुख्याध्यापकांनी संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे १८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत सादर करावेत, असे छत्रपती संभाजीनगर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी कळविले आहे.

परीक्षेचे विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे विनामुल्य उपलब्ध आहेत. अमरावती आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी, पांढरकवडा, किनवट, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद आणि कळमनुरी यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या १२ जिल्ह्यांतील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व शासन मान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवी ते आठवीमध्ये शिकत असलेले अनुसुचित, आदिम जमातीचे विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र राहतील, असे श्रीमती मोरे यांनी कळविले आहे.

## प्रतिक्रिया ..

बजेट होता सादर
साचेबद्ध प्रतिक्रिया
तीचं आरडा ओरड
क्या है रे इसमें नया

तोचं विचारती प्रश्न
भय्याहमे क्या दिया
बळीराजा उमाळा
येते गरीबांची दया

चांगले दूध नासवूनं
विरजण लावे दह्या
वाद विवाद कराया
पसरून उभे बाह्या

कपडे वरती नवीन
आतूनखंगली काया
प्रेझेंटेशन महत्वाचे
सगळी आकडेमाया

सर्वसमावेशकबजेट
सोपी नसते प्रक्रिया
सादर करणा-याची
कसास लागे किमया

आकड्यांच्या खेळां
भरल्यां गच्चं वह्या
बजेट किती खराब
फुटू लागती लाह्या

मग विरोध दर्शावयां
गोळा करता सह्या
तोचं तो शोक संदेश
चालू होती दशक्रिया

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# संरक्षण समितीचे नुतन अध्यक्षपदाची मनोज हरिभाऊ सुवर्णकार यांची निवड

**लातूर/प्रतिनिधीः** ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय ७३ वी महाशिवरात्री यात्रा महोत्सव लातूर, रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरूवात होणार आहे तरी, त्या प्रती दि. २५/०१/२०२६ रोजी दुपारी १२ वाजता प्रशासक व विश्वस्तांच्या वतीने बैठकीचे आयोजन श्री सिद्धेश्वर मंदिर येथे आयोजित केली होती ती व्यवस्थित रित्या पार पडली. तसेच त्यावेळी विश्वस्तांच्या विविध कल्याणकारी समितींच्या प्रमुख पदांच्या नियुक्त्या करण्यात आल्या व दरवर्षीच्या ठरल्या प्रमाणे संरक्षण समितीचे नुतन अध्यक्ष पदाची सर्वांनुमते निवड झाली त्या निवडी मध्ये या वर्षीचे अध्यक्ष पत्रकार. श्री मनोज हरिभाऊ सुवर्णकार यांची निवड करण्यात आली व तसेच संरक्षण समितीचे प्रमुख विष्णुजी साबदे साहेब, राजेश्वरजी अंकलकोटे, राजकुमार पिटले, सुशीलजी पोकर्णा, योगेश गवळी, रमेश काटवटे, व इतर सर्व सदस्य या वेळी उपस्थित होते



# स्वास्थ्याबद्दलचा विचार आणि कृती बदलायला हवी - प्रा. मीत शिंदे

**लातूर/प्रतिनिधीः** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथील महिला अभ्यास केंद्राच्या वतीने होलिस्टिक ॲप्रोच टू मेंटल वेलनेस या विषयावर बहुविषयक परिसंवाद पार पडला. परिसंवादाला प्रमुख वक्ते म्हणून प्रा. मित. डी. शिंदे (सहायक प्राध्यापक, मानसशास्त्र पी. एन. दोशी महिला महाविद्यालय, मुंबई ) हे लाभले होते. त्यांनी तणाव, नैराश्य, स्पर्धा आणि अपेक्षांच्या ओझ्यात अडकलेल्या तरुणांनी मानसिक संतुलन कसे राखावे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी मानसिक स्वास्थ्याला शारीरिक, सामाजिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे असे सांगितले. संविधानातसुद्धा मानसिक स्वास्थ्याला महत्व दिले आहे. त्या दृष्टिकोनातून सुद्धा त्यांनी वेगवेगळे उदाहरण देऊन सविस्तर मार्गदर्शन केले.




या राष्ट्रीय सेमिनारसाठी दुसरे प्रमुख वक्त्या डॉ. उज्वल अनिल नेने (मानसोपचारतज्ञ के. ई. एम. हॉस्पिटल, पुणे) ह्या लाभल्या होत्या. त्यांनी दैनंदिन जीवनातील ताणतणाव ओळखणे, भावनांचे व्यवस्थापन आणि वेळेवर समुपदेशन घेण्याचे महत्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी शिक्षणासोबत मानसिक स्वास्थ्याची जाणीव निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. व्यासपीठावर संस्थेचे संयुक्त सचिव जेष्ठ विधीज्ञ ड. श्रीकांतजी उटगे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ज्येष्ठ विधीज्ञ ड. आशिषजी बाजपाई व सी.ए. सुदर्शनजी भांगडिया तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, समुपदेशक वैशाली चापसी आणि दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पूनम नाथानी व इतर महाविद्यालयाचे प्राचार्य व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. रविंद्र शेट्टी तर आभार प्रदर्शन प्रा. स्वाती पाटील यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक डॉ. संगीता महाजन, सहसमन्वयक प्रा. स्वाती पाटील व प्रा. अतिश तिवारी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. या नॅशनल सेमिनारसाठी दयानंद शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६